speed post

# मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी यांचे समोर

( क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६/220)

**माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ नुसार अपिल अर्ज**

अध्यक्ष
श्री करिबसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय,
कासार सिरसी ता. निलंगा जि. लातुर ... अर्जदार

विरुध्द

सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय , ... प्रतिवादी
छत्रपती संभाजीनगर

श्री शाम पंडीतराव मुळजकर पत्रकार मु.पो. कासारसिर ... सहप्रतिवादी
ता. निलंगा जि. लातुर

## प्रस्तावना

सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्री करिबसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, कासार सिरसी ता. निलंगा जि. लातुर, या संस्थेत अनुदानित तत्वावर सुरु असणाऱ्या १)हॉर्टीकल्चर २)क्रॉपसायन्स ३)कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी या तीनही उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांची मान्यता काढून घेण्यांत आली आहे.

२. माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ मध्ये शाळेची मान्यता अंशत: काढून घेतलेली असेल त्या शाळेच्या व्यवस्थापनास उक्त आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत संचालकांकडे अपिल दाखल करता येईल असे नमूद केल्याप्रमाणे संस्थेच्या दोन्ही कार्यकारी मंडळाचे दि. ०१/०६/२०२६ व १२/०६/२०२६ रोजी संचालनालयास अपिल केले होते. या अपिल अर्जाच्या अनुषंगाने संबंधित शिक्षण संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा.संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे समोर दि.१६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

## पूर्वपीठिका

३. श्री करिबसवेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय कासारशिरसी तालुका निलंगा, जिल्हा लातूर या संस्थेची मान्यता रद्द केल्याबाबत दोन वेगवेगळ्या कार्यकारी मंडळांकडून अपील अर्ज संचालनालयास प्राप्त झाले. संचालनालयाच्या दिनांक २५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रा.का. छत्रपती संभाजीनगर यांना अपील अर्जाच्या अनुषंगाने संस्थेच्या न्यायालयीन प्रकरणाची सद्यास्थिती व सुनावणीच्या अनुषंगाने संपुर्ण घटनाक्रम व अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच संचालनालयाच्या दिनांक २५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक धर्मादाय आयुक्त -२, नोंदणी कार्यालय लातूर यांना सदर संस्थेच्या बाबत दोन कार्यकारी मंडळांकडून अर्ज प्राप्त झाल्याने सद्यस्थितीत वैध व कार्यरत असलेल्या कार्यकारी मंडळाची परिशिष्ट -१ सहीत माहिती, तसेच बदल अहवाल प्रलंबित/मंजूर असल्यास त्याची अद्ययावत स्थिति संचालनालयास तत्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कळविले.

त्या अनुषंगाने सहसंचालक, प्रा. का. छत्रपती संभाजीनगर यांनी तपशिलवार अहवाल दिनांक ९/०७/२०२६ च्या पत्रान्वये संचालनालयात सादर केला.

## सुनावणी

सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक १६/०७/२०२६ रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक ०९/०७/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात आले होते. संस्थेची अंतिम सुनावणी दिनांक १६ जुलै २०२६ रोजी मा. संचालक यांचे समोर घेण्यात आली.

**४. सुनावणीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते :**

- श्री. नि. आ. निकम, उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्रीमती सो. कि. चौधरी, सहायक संचालक (तांत्रिक), संचालनालय, मुंबई
- श्री.ए.पी.शिंदे, उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
- श्री.पी.जे.औताडे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर
- प्रतिवादी संस्थेच्या वतीने

१. श्री. गिरीष गुलाबराव चिंचनसुरे, उपाध्यक्ष
२. श्री. सुधीर वाबुराव चिंचनसुरे, सचिव
३. श्रीमती निता शिवदर्शन चिंचनसुरे,उपाध्यक्ष
४. श्री.शिवदर्शन बाबुराव चिंचनसुरे. सचिव
५. श्रीमती मुरुमकर सविता संभाजीराव प्राचार्य

अपिलार्थी यांना दिनांक १६/०७/२०२६ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा.संचालक यांनी सदर संस्थेस मानका प्रमाणे त्रुटी पुर्तता करण्यासंबधी अंतिम संधी देण्यात येत असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना श्री अल्टे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून निरीक्षण अहवाल दि. १७/०६/२०२६ पर्यंत संचालनालयास सादर करावे असे निर्देश दिले.

## अपिलार्थी यांचा युक्तिवाद

५. अपिलार्थी यांनी नमूद केले की :

अपीलार्थी यांनी सुनावणीदरम्यान नमूद केले की, सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी हजेरी पत्रके संबंधित कार्यालयीन कनिष्ठ लिपिक श्रीमती एम. एस. चिंचनसुरे यांच्या ताब्यात असल्याने ती उपलब्ध करून देता आलेली नाहीत. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे व हस्तांतरण प्रमाणपत्रे (Transfer Certificate - T.C.) हीदेखील त्यांच्या ताब्यात असल्यामुळे निरीक्षण समितीसमोर सादर करता आलेली नाहीत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये श्री. एस. व्ही. पलंगे, श्री. बी. बी. सोनावणे, श्री. एस. बी. कदम, श्री. बी. बी. लोंढे (पूर्णवेळ शिक्षक) हे दि. १५/०६/२०२६ पासून तसेच श्रीमती एम. एस. चिंचनसुरे (कनिष्ठ लिपिक) या दि. १३/०६/२०२६ पासून आजतागायत संस्थेत अनुपस्थित आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांचा पगार माहे मे २०२६ अखेरपर्यंत अदा करण्यात आलेला असल्याचेही त्यांनी नमूद केले. समायोजन आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले नसल्याबाबत अपीलार्थी यांनी असे स्पष्ट केले की, संबंधित अनुपस्थित कर्मचारी कार्यमुक्त होण्यासाठी आजतागायत संस्थेत व्यक्तिशः उपस्थित झालेले नाहीत. तसेच श्री. के. एच.

कोटे यांनी कार्यमुक्त करण्यासाठी अर्ज सादर केला असला, तरी संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. समायोजन व बंद आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे याचिका दाखल करण्यात आली असून संस्थेमार्फत मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे अपील सादर करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मा. संचालक यांच्या समक्ष सुनावणी सुरू असल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. सध्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये श्री. के. एच. कोटे (पूर्णवेळ निदेशक - प्रॅक्टिकल) व श्री. वाय. एम. जळळे (हमाल) हे दोन कर्मचारी संस्थेत कार्यरत असल्याचे अपीलार्थी यांनी नमूद केले.

इयत्ता १२ वी व्यवसाय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी दि. १५/०६/२०२६ ते दि. १९/०६/२०२६ या कालावधीत नियमितपणे संस्थेत उपस्थित राहत होते. तथापि, अध्यापन करणारे चार शिक्षक व कनिष्ठ लिपिक अनुपस्थित असल्याने तसेच संबंधित विभागाच्या चाव्या त्यांच्या ताब्यात असल्यामुळे विभाग बंद राहिला व विद्यार्थ्यांना परत जावे लागले, असे अपीलार्थी यांनी सांगितले.

अपीलार्थी यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांची बदली झाल्याची तसेच महाविद्यालय बंद झाल्याची माहिती दिल्यामुळे विद्यार्थी व पालकांनी विविध सक्षम प्राधिकरणांकडे इयत्ता १२ वीचे वर्ग पूर्ववत सुरू ठेवण्याची विनंती केली आहे. तसेच प्राचार्य यांच्या वतीने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे दिवाणी अर्ज दाखल करण्यात आला असून न्यायालयाने सदर प्रकरण मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे निर्णयासाठी पाठविले आहे. तसेच अध्यापनासाठी आवश्यक शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी नियमितपणे प्रशालेत उपस्थित राहत नसल्याचे अपीलार्थी यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता १२ वीचे वर्ग सुरू ठेवण्याची विनंती अपीलार्थी यांनी केली.

**प्रतिवादी यांचा युक्तिवाद**

**६. प्रतिवादी सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान नमूद केले की, :-**

सदर संस्थेस वारंवार सुचना / कारणे दाखवा नोटीस देवूनही संस्थेने त्रुटी पुर्तता केलेली नाही. त्यामुळे माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ७.१ मधील तरतुदी नुसार श्री करिबसवेश्वर कासारसिरसी महाविद्यालय निलंगा जि.लातूर या स्थंस्थेतील १) हॉटीकल्चर-०१ तुकडी २) क्रॉपसायन्स ०१ तुकडी, ३) कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी -०१ तुकडी या तीनही अनुदानित व्यवसाय अभ्यासक्रम अभ्यासक्रमाची मान्यता अन्वये काढून घेण्यात आलेली आहे तसेच संदर्भ क्रमांक २८ अन्वये सदर कर्मचायांचे समायोजन देखील करण्यांत आलेले आहे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर यांचे पत्र क्र.४३७ दिनांक १८.०६.२०२६ अन्वये १) हॉटीकल्चर २) क्रॉपसायन्स ३) कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी या व्यवसाय अभ्यासक्रमा मधील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या संस्थेत करण्यांत आलेले आहे.

सदर संस्थेविरुद्ध शाळा संहितेतील तरतुदींनुसार नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली असून ती योग्य असल्याचे प्रतिवादी कार्यालयाने नमूद केले.

तसेच सदर प्रकरणी प्राचार्य, श्री. करिबस्वेश्वर कासारसिरसी, ता. निलंगा, जि. लातूर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे याचिका क्र. WP No. S५९४/२०२६ दाखल केली आहे. सदर प्रकरणी दि. ०१/०७/२०२६ रोजी सुनावणी झाली असून, मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०९/०७/२०२६ रोजीच्या आदेशानुसार सदर अपीलावर मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी तीन आठवड्यांच्या आत निर्णय घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## सहप्रतिवादी यांचा युक्तिवाद

७. सहप्रतिवादी श्री शाम पंडीतराव मुळजकर पत्रकार मु.पो. कासारसिरसी ता. निलंगा जि. लातुर, यांनी नमूद केले की,

सहप्रतिवादी श्री. शाम पंडीतराव मुळजकर यांनी नमूद केले की, श्री. करिबस्वेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कासारसिरसी येथील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागात मागील वर्षापासून विद्यार्थी उपस्थित नसल्याने प्रशिक्षण बंद आहे. याबाबत संबंधित कार्यालयास वेळोवेळी पुराव्यासह कळविण्यात आले आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, जून २०२५ पासून सदर विभागात एकही विद्यार्थी उपस्थित नसून, विभागामध्ये आवश्यक भौतिक सुविधा, सुसज्ज इमारत, वर्गखोल्या, कार्यशाळा, यंत्रसामग्री, प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी आवश्यक साधने, विद्युत व्यवस्था व इतर मानकानुसार सुविधा उपलब्ध नाहीत.

तसेच क्रॉप सायन्स, हॉर्टिकल्चर व कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी या व्यावसायिक विभागांसाठी आवश्यक कार्यशाळा व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले. विभागातील इमारत धोकादायक अवस्थेत असून विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.
सहप्रतिवादी यांनी विनंती केली की, संस्थेकडे शासन मानकानुसार आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी रद्द केलेली मान्यता कायम ठेवावी.

## निष्कर्ष

अपिलार्थी, प्रतिवादी व सहप्रतिवादी यांचे युक्तिवाद तसेच अंतिम त्रुटीपूर्ती निरीक्षण अल्टे समितीचा दिनांक २२ जुलै २०२६चा निरीक्षण अहवाल यांचा विचार करून निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. सदर अपिल अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी समाधानकारक स्वरूपात सिद्ध झालेल्या नाहीत. संस्थेतील त्रुटी गंभीर स्वरूपाच्या असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास बाधक आहेत.
२. संस्थेत मानकाप्रमाणे आवश्यक असणारी जागा कार्यशाळा पुरेशा प्रमाणात / वर्गखोल्या / नसल्याचे निदर्शनास येत आहे.
३. सबब सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजी दिलेला आदेश योग्य, कायदेशीर व न्याय्य असल्याचे दिसून येते.
४. सदर अभ्यासक्रमात प्रामुख्याने मानकाप्रमाणे विद्युतभार व यंत्रसामुग्रीची त्रुटी असल्याने खालील बाबी प्रकर्षाने निदर्शनास येत आहेत.
५. वरील बाबींचा साकल्याने विचार करता सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभजीनगर यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ नुसार संचालक हे संस्थांच्या अपिलाच्या अर्जावर निर्णय देण्यास सक्षम प्राधिकारी असल्याने सदर संस्थेच्या अपिल अर्जावर खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

१) श्री. करिबस्वेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कासारसिरसी, ता. निलंगा, जि. लातूर येथील अनुदानित तत्त्वावरील (१) क्रॉप सायन्स, (२) हॉर्टिकल्चर व (३) कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी या तीनही उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून मान्यता काढून घेण्यात येत आहे.

२) संस्थेने सदर अभ्यासक्रमातील सन २०२६-२७ पासून इ.११ वीचे प्रवेश बंद करण्यात यावेत. सद्य:स्थितीत प्रवेशित विद्यार्थ्यांचे इ.१२ वीचे सत्र पूर्ण होईपर्यंत नियमाप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण करण्यात यावे.

३)संस्थेने जर मान्यता काढून घेण्यात आलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेश केले तर त्यांचेवर महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याकरीता व तत्ससंबधित किंवा तद्अनुषांगिक बाबीकरीता तरतूद करण्यासाठी अधिनियम (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

४)माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ नुसार सदर आदेश हे अंतिम राहील व व्यवस्थापनावर बंधनकारक राहील.

४)प्रस्तुत निर्णयाची माहिती संस्थेमार्फत सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

( सतिश कृ. सुर्यवंशी )
संचालक

स्थळ - मुंबई
दिनांक - २९/०६/२०२५

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय,लातूर
३. श्री. करिबस्वेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कासार सिरसी ता.निलंगा जि.लातूर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, लातूर यांचेमार्फत)
५. निवडनस्ती (का.क्र.०५)